REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2025


# संतांचा महाराष्ट्र

**डॉ. श्रीराम इंदिरा यशवंत गडकर**
**सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, विद्या प्रतिष्ठानचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,**
**विद्यानगरी, बारामती, जि. पुणे.**

“संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।
ज्ञानदेवें रचिला पाया। उभारिलें देवालया ।।
नामा तयाचा किंकर । तेणें रचिलें ते आवार ।।
जनार्दन एकनाथ । खांब दिघला भागवत ।।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।
बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरूपणा केलें वोजा ।।”



**संत बहिणाबाई (जन्म – १६२९ )**



या साध्या-सोप्या अभंगात प्रारंभीच्या चार शतकांचा महाराष्ट्रातील संतांचा इतिहास बहिणाबाईने सांगितला आहे. पंढरपूरच्या पांडुरंगाचे भक्त असलेल्या या संतांनी महाराष्ट्राची जडणघडण केली आहे.

संत ज्ञानेश्वर (इ.स. १२७५ - इ. स. १२९६) हे महाराष्ट्रातील संत चळवळीचे वैचारिक प्रबोधनाचे प्रणेते आहेत. त्यांनी वयाच्या सोळाव्या वर्षी ‘ज्ञानेश्वरी’ची निर्मिती केली. या संदर्भात ल. रा. पांगारकर म्हणतात की, “लक्षावधी लोकांच्या हृदयात आत्मसुखाची शीतल छाया पाडणारा ज्ञानेश्वरी सारखा दैदीप्यमान हिरा हे मराठी भाषेचे परम ऐश्वर्य आहे, विश्वाच्या **वाङ्मय**ात ज्ञानेश्वरीसारखा सर्वांगसुंदर ग्रंथ झालाच नाही. यातील जी जी ओवी समोर येते, ती ती द्राक्षपाक ! कठोरता कोठेच नाही. प्रेम, प्रसाद आणि प्रतिभा यांचा रम्य संयोग येथे झाला आहे. ज्ञानेश्वर माऊलीने कर्म-ज्ञान-उपासकांना एका रेषेत आणून, ज्ञान-भक्तीच्या भजनी लावले आहे. सगुण-निर्गुण, द्वैत-अद्वैत, शैव-वैष्णव हे सारे भेद अद्वयानंदाच्या महासागरात बुडवून टाकले आहेत. धर्म, तत्त्वज्ञान, कवित्व व साहित्य यांची एक मूस म्हणजे ज्ञानेश्वरी !” ❶ (ल. रा. पांगारकर, (लेख - ‘ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानेश्वरी’ संकलन - डॉ. हे. वि. इनामदार), ‘ज्ञानेश्वरी दशरूप दर्शन’, संपादक - डॉ. हे. वि. इनामदार, चंद्रमा प्रकाशन, पुणे. ४११००९. प्रथमावृत्ती - १९ जानेवारी १९९०, पृ. क्र. १४१) पांगारकर यांचे हे मत सर्वांना पटण्याजोगे आहे. संत ज्ञानेश्वर यांच्या तत्त्वज्ञानामुळे सामाजिक जीवनाचा पाया बळकट झाला.

त्यांनी 'ज्ञानेश्वरी'(इ. स. १२९०), 'अमृतानुभव'(इ. स. १२९२), 'चांगदेवपासष्टी'(इ. स. १२९४) या ग्रंथांची व अभंग, हरिपाठाचे अभंग, विराण्या यांची निर्मिती केली. नंतरच्या कालखंडात महाराष्ट्रावर असंख्य प्रकारची आक्रमणे झाली. त्याला तोंड देण्याचे सामर्थ्य व मनोबल



"माझा मराठाचि बोलु कौतिके। परि अमृतातेही पैजा जिं के।
ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन ॥"

अशा शब्दांत वाढवून त्यांनी मराठी भाषेविषयीचा अभिमान सात-आठ शतकांपूर्वी व्यक्त केला आहे.

"आता विश्वात्मके देवे। येणे वाग्यज्ञ तोषावे।
संत ज्ञानेश्वर तोषोनि मजा द्यावे। पसायदान हे ॥"

त्यांच्या या 'पसायदाना'त त्यांचे विश्वव्यापी मोठेपण, साधुत्व आणि प्रांजळता दिसते. पसायदानाचे कौतुक करताना डॉल. रा. नसिराबादकर . म्हणतात की, "आपल्या भावार्थदीपिकेत ज्ञानेश्वरांनी 'विश्व हे मोहरें' लावण्यावर व लोकांशी समरस होण्यावर भर दिला आहेडोळयांसमोर  त्यांचे पसायदान हे जसे त्यांच्या व्यापक मानवतावादाचे प्रतीक आहे तसेच त्यांच्या . असलेल्या आदर्श समाजजीवनाचे ते सुरेख कल्पनाचित्रही आहे. ज्ञानेश्वरांच्या प्रेमळ व प्रसन्न व्यक्तित्वात वसणारी आर्ताविषयीची करुणा हा त्यांच्या समाजचिंतनाचा मूलाधार आहे" ❷ डॉ. ल. रा. नसिराबादकर), (लेख - 'ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानेश्वरी' संकलन (वि. इनामदार .डॉ. हे -, 'ज्ञानेश्वरी दशरूप दर्शन', संपादक डॉ. हे. वि. इनामदार -, चंद्रमा प्रकाशन, पुणे .४११००९ . १९९०जानेवारी  १९ -प्रथमावृत्ती , पृ(१४३   . . डॉल. रा. नसिराबादकर . यांनी केलेले हे कौतुक सर्वमान्य आहे.

"रूप पाहता लोचनीं। सुख झाले हो साजणी
तो हा विठ्ठल बरवा। तो हा माधव बरवा संत ज्ञानेश्वर
बहुता सुकृतांची जोडी। म्हणुनि विठ्ठलीं आवडी
सर्व सुखाचे आगरू। बापरखमादेविवरू।।"

हा पंढरपूरच्या पांडुरंगाचे वर्णन करणारा अभंग वारकऱ्यांच्या आवडीचा आहे.

"अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक।
जाईन गे माय तया पंढरपुरा। भेटेन माहेरा आपुलिया ॥"

'पंढरपूर' या तीर्थक्षेत्रासोबत ते माहेराचं नातं जोडतात.

"पैल तो गे काऊ कोकताहे । शकून गे माये सांगताहे ॥"

किंवा

"घनु वाजे घुणुघुणा । वारा वाजे रुणुझुणा ।
भवतारकु हा कान्हा । वेगी भेटवा कां ॥"

या विराण्यांतून वारकऱ्यांना लागलेल्या विठ्ठलाच्या भेटीच्या ओढीचे उत्कट दर्शन घडते.

"देवाचिया द्वारी उभा क्षणभरी। तेणे मुक्ती चारी साधियेल्या ।
हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ॥",
"भावेवीण भक्ती भक्तीवीण मुक्ती । बळेवीण शक्ती बोलू नये ॥",
"योग याग विधी येणे नवे सिद्धी । वयाची उपाधी दम्भाधर्मा ॥"

हे त्यांनी निर्माण केलेले 'हरिपाठाचे अभंग' वारकऱ्यांच्या घरोघरी आजही म्हटले जातात. मनात भावभक्ती असल्याशिवाय संसाराचा पाश सुटत नाही. साधुसंतांच्या संगतीशिवाय तरणोपाय नाही असा संदेश संत ज्ञानेश्वर देतात.

भक्त, तत्त्वज्ञ व कवी अशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची रूपे आपल्याला त्यांच्या वाङ्मयीन कार्यातून दिसून येतात.

सगुण भक्तीत रमून समाजाला मानवतेची उपासना शिकवून भागवत धर्माची पताका पंढरपूरपासून पंजाबपर्यंत नेणाऱ्या संत नामदेवांचे (इ. स. १२७० - इ. स. १३५०) व्यक्तिमत्त्व भाववेडे असे आहे. संत नामदेवांच्या कुटुंबातील दामाशेटी, आई - गोणाई, पत्नी - राजाई, बहीण - आऊबाई, लेक - लिंबाई, सुना - लाडाई, गोडाई, येसाई, पुतणी - नागरीबाई, इ. कुटुंबातील सदस्य विठ्ठलभक्तीत रममाण झाले होते. "शतकोटी तुझे करीन अभंग" अशी त्यांची प्रतिज्ञा होती. कर्मठपणा, व्रतवैकल्ये, संन्यास इ. गोष्टींचा त्याग करायला नामदेवांनी शिकविले.

"अंतरी निर्मळ, वाचेचा रसाळ । त्याच्या गळा माळ असो नसो ॥"

असं आचरण असणाऱ्या व्यक्तीला त्यांनी वारकरी संप्रदायात प्रवेश दिला.

"नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ॥"

असा मनाशी संकल्प करून वारकरी कीर्तन परंपरेचा प्रारंभ करून महाराष्ट्रातील जनतेचे प्रबोधन केले.

"नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी ॥"

असा संत ज्ञानेश्वरांचा व 'ज्ञानेश्वरी'चा गौरव केला आहे.

"युगे अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥"

ही त्यांनी लिहिलेली विठ्ठलाची आरती संपूर्ण महाराष्ट्र मोठ्या भक्तिभावाने आजही म्हणत आहे.

"अमृताहुनि गोड नाम तुझे देवा"

अशी निर्मिती करून महाराष्ट्राला अभंगांचा परिचय करून दिला.



"शिंपियाचे कुळी जन्म मज जाला। परि हेतु गुंतला सदा शिवीं ।
रात्रीमाजी शिवीं दिवसामाजी शिवीं ।आराणुक जीवीं नाही माझ्या ।
सुई आणि सातुळी, कात्री गज दोरा। मांडिला पसारा सदा शिवीं ।

**संत नामदेव (इ.स. १२७० - इ. स. १३५०)**

नामा म्हणें शिवीं विठोबाचे अंगी। त्याचेनि मी जगी धन्य झालो ।।"

अशा काही अभंगांमधून ते स्वतःबद्दल बोलत राहतात.

"अगा ये विठोबा पाहे मजकडे । कां गा केले वेडे बाळ माझे"

विठ्ठलभक्तीत रममाण झालेल्या आपल्या मुलासाठी विठ्ठलासोबत भांडणाऱ्या आईचे (गोणाई) व्यक्तिचित्र ते एका अभंगांमध्ये शब्दबद्ध करतात.

"लावोनि लंगोटी जालेती गोसावी । आमुचि उठाठेवी कोण करी ।
सुखाचा संसार करोनि बारा वाटे । नाव केले मोठे जगामाजी ।।"

विठ्ठलभक्तीत रममाण झालेल्या आपल्या नवऱ्यासाठी विठ्ठलासोबत भांडणाऱ्या पत्नीचे (राजाई) व्यक्तिचित्र ते एका अभंगांमध्ये शब्दबद्ध करतात.

"माझे मनी ऐसे होत असे गा देवा । देह समर्पावा तुझे पायी ॥",
"अरे मना मर्कटा । पापिया चांडाळा लंपटा ॥",
"पाहू द्या रे मज विठोबाचे मुख । लागलीसे भूक डोळा माझ्या ॥",
"पतित पावन होसी म्हणूनि आलो मी दारा । पतित पावन नव्हेसि म्हणून जातो माघारा ॥",
"देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो ॥",
"सुखाचे हे सुख । श्रीहरी मुख ॥",

"नाम घेता भगवंताचे । पाश तुटती भवाचे ॥",
"देव भावाचा भुकेला । याती कळेनाही त्याला ॥",
"नामा म्हणे केशवा । अहो जी तुम्ही दातारा ।
जन्मोजन्मी द्यावी । तुमची चरण सेवा ॥"

हे व त्यांचे हजारो अभंग त्यांच्या संवेदनशीलतेची साक्ष देतात.


वर्णव्यवस्थेचे, जातिव्यवस्थेचे कर्मठपणे पालन होणाऱ्या कालखंडात गोरा कुंभार (गोरोबाकाका) (इ. स. १२६७ - इ. स. १३०९), सावता माळी (इ. स. १२५० - इ. स. १२९५), नरहरी सोनार, चोखामेळा (इ. स. १२७३ - इ. स. १३३८), सोयराबाई (चोखोबाकाकांची पत्नी), बंका (चोखोबाकाकांचा मेहुणा), निर्मळा (चोखोबाकाकांची धाकटी बहीण), कर्ममेळा (चोखोबाकाकांचा मुलगा), सेना न्हावी (मृत्यू - १४४८), परिसा भागवत, विसोबा खेचर (मृत्यू - इ. स. १३०९), जोगा परमानंद (मृत्यू - इ. स. १३३८), जगन्मित्र नागा, मुक्ताबाई (इ. स. १२७९ - इ. स. १२९७), जनाबाई (इ. स. १२५८ - इ. स. १३५०), भागुबाई, कान्होपात्रा (पंधरावे शतक), बहिणाबाई (जन्म – १६२९), इ. अठरापगड जातीतील संत स्त्री-पुरुषांना चंद्रभागेच्या वाळवंटात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांनी एकत्र आणून वारकरी पंथात 'आध्यात्मिक लोकशाही' निर्माण करून महाराष्ट्रात 'सामाजिक क्रांती' केली. अठरापगड जातीतील या सर्व संतांनी आपल्या व्यवसायातच विठ्ठल पाहिला आणि सारे जीवन विठ्ठलमय करून टाकले. विठ्ठल सर्वव्यापी आहे. तो आपल्यातच सामावला आहे. विठ्ठलाच्या दर्शनाची ओढ व त्यानंतर झालेल्या भेटीचा आनंद संतमेळ्याच्या अभंगवाणीत व्यक्त झाला आहे.



"म्हणे गोरा कुंभार विठ्ठल मंत्र सोपा । एक वेळा बापा उच्चारी रे ॥",
"देवा तुझा मी कुंभार । नासी पापाचे डोंगर ॥",

**संत गोरा कुंभार (इ. स. १२६७ - इ. स. १३०९)**

"आमुचि माळयाची जात । शेत लाव बागाईत ।
आम्हा हाती मोट नाडा । पाणी जाते फूलझाडा ॥",
"कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।
लसूण मिरची कोथिंबिरी ।अवघा झाला माझा हरी ॥
मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ।।
सांवता म्हणे केला मळा । विठ्ठलपायी गोविला गळा ॥",



**संत सावता माळी (इ. स. १२५० - इ. स. १२९५)**

"आत्मा अनुभवी पाहता । देव दिसे हो तत्त्वता ॥
गुरुकृपा होय पूर्ण । नरहरी लटपट निशिदिन ॥",
"देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ।
देह बागेसरी जाणे । अंतरात्मा जाण सोने ।



**संत नरहरी सोनार**

त्रिगुणाची करुनी मूस । आत ओतिला ब्रह्मरस ।
जीव शिव करुनि फुंकी। रात्रंदिवस ठोका ठोकी ।",
"नव्हे ते सगुण नव्हे ते निर्गुण। जाणती हे खूण तत्त्वज्ञानी",
"नाम फुकाचे फुकाचे । देवा पंढरिरायाचे",

"विठ्ठल विठ्ठल गजरी। अवघी दुमदुमली पंढरी ।
होतो नामाचा गजर । दिंड्या पताकांचा भार ।
निवृत्ति ज्ञानदेव सोपान । अपार वैष्णव ते जाण।
हरी कीर्तनाची दाटी। तेथे चोखा घाली मिठी ॥",
“देवा नाही रूप देवा नाही नाम । देव हा निष्काम सर्वांठाई ॥
डोळियाचा डोळा दृष्टीच भासला । देव प्रकाशला आदि-अंती ॥
नवल वाटलें नवल वाटलें । देव कोंदाटले मार्गे-पुढें ॥
चोखा म्हणे माझा संदेह फिटला । देव प्रगटला देहामाजी ॥”,
"वैकुंठ पंढरी भिवरेचे तीरीं। प्रत्यक्ष श्रीहरी उभा तेथे",



**संत चोखामेळा (इ. स. १२७३ - इ. स. १३३८)**

"पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी । प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे",
"बहुत हिंडलो देश देशांतर। परि मन नाही स्थिर झाले कोठे",
"जोहार मायबाप जोहार । तुमच्या महाराचा मी महार ॥",
"कोण तो सोवळा कोण तो ओवळा । दोन्हीच्या वेगळा विठू माझा ॥",
“ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ॥”,

"आलो तुझ्या दर्शनासी । भेट दयावी बा आम्हांसी।।
सर्व संत हो राऊळीं। मी रे एकटी तळमळी ॥
करुणा आईक विठाई । मज बाळा भेटी देई ॥
देव आले हो बाहेरी । मज नेलें खांदयावरी ॥
भागु म्हणे भेट झाली । माझी चिंता ही हारली ॥",



"जाता पंढरीसी सुख वाटे जीवा । आनंदे केशवा भेटताची ॥",
"घेता नाम विठोबाचे । पर्वत जळती पापांचे ॥",
"करीसी खटपटी । पोटासाठी आटाआटी ॥",
नाम घेता विठोबाचे । काय तुझ्या बाचे जाते ॥",
"आम्ही वारीक वारीक । करू हजामत बारीक ॥",

**संत सेना न्हावी (मृत्यू - १४४८)**



"परसा वदे नामयासी । तुझे पूर्वज माझे चरणापाशी ।
जरी तू हरिदास झालासी । तरी याती हीनची ॥",
"दुधावरील साय ते मी वानू काय । तैसे गाणे गाय नामदेव ॥", **संत परिसा भागवत**



"खेचर विसा प्रेमाचा पिसा",
"मुळु वदनाचा उधानु नेत्रांचा । अंगुळु हस्ताचा स्वामी माझा ॥", **संत विसोबा खेचर**

"मुंगी उडाली आकाशीं । तिने गिळिले सूर्याशी ।
थोर नवलाव झाला । वांझे पुत्र प्रसवला ।
विंचू पाताळाशी जाय । शेष माथा वंदी पाय ।
माशी व्याली घार झाली । देखोन मुक्ताई हासली ॥",
"मजवरी दया करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।
संत जेणे व्हावे । जग बोलणे सोसावे ।।
तरीच अंगी थोरपण । जया नाही अभिमान ।
थोरपण जेथे वसे । तेथे भूतदया असे ।।
योगी पावन मनाचा । साहे अपराध जनाचा ।
विश्व झालीया वन्ही । संत सुखे व्हावे पाणी ॥",



**संत मुक्ताबाई (इ. स. १२७९ - इ. स. १२९७)**

"सर्व सुखाचा आगर । उभा असे विटेवर ॥",
"नाम फुकट चोखट । नाम घेता न ये विट ॥",
"नाम विठोबाचे घ्यावे । मग पाऊल टाकावे ॥",
"विठू माझा लेकुरवाळा । संगे लेकरांचा मळा ॥",
"येरे येरे माझ्या रामा । मनमोहन मेघश्यामा ॥",
"ये ग ये ग विठाबाई । माझे पंढरीचे आई ।
भीमा आणि चंद्रभागा । तुझे चरणीच्या गंगा ॥",
"राग येऊनी काय करिसी । तुझे बळ आम्हापाशी ॥",



**संत जनाबाई (इ. स. १२५८ - इ. स. १३५०)**

"अरे विठ्या अरे विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ॥",
"झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी ॥",
"देव खाते देव पिते । देवावरी मी निजते ॥",
"द्वारकेच्या राया । बुद्धी दे गा नाम गाया ॥",
"ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ।
मरोनिया जावे । बा तुझ्या पोटा यावे ॥",
"जनी म्हणे जोड झाली विठोबाची । दासी नामयाची म्हणोनिया ॥",
"कैवल्याचा दानी। म्हणे नामयाची जनी ॥",

"घ्या रे घ्या रे मुखी नाम । अंतरी धरूनिया प्रेम ।
ऐसी नाममाळा । कान्होपात्रा ल्याली गळा ॥",
"माझे जीवीचे जीवन । तो विठ्ठल निधान ॥",
"हरली ती भूक तहान निमाली । संतांची देखीली चरणांबुजे ।।
कीर्तनाचे रंगी आनंदे नाचतां । कान्होपात्रा चित्ता समाधान ।।",



**संत कान्होपात्रा (पंधरावे शतक)**

"मज अधिकार नाही । भेटी देई विठाबाई ॥",
"नको देवराया । अंत आता पाहू । प्राण हा सर्वथा । फुटो पाहे ॥"

यासारख्या अभंगातून याची प्रचिती येते. संतांच्या या भूमिकेमुळे बहुजनांच्या मनातील न्यूनगंड कमी झाला. भक्तीचे हे दार शूद्र-अतिशूद्रांना, पतितांना स्त्रियांना उघडून त्यांना सामाजिक, मानसिक आधार देण्याचे फार मोठे कार्य केले.

संत ज्ञानेश्वरांच्या नंतर सुमारे ३०० वर्षांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे पुनरुज्जीवन घडविण्याचे कार्य संत एकनाथांनी (इ. स. १५२८ - इ. स. १५९९) केले. पंडित, सर्वसामान्य माणूस व बहुजन समाज यांना 'चतुःश्लोकी भागवत', 'एकनाथी भागवत' ( इ. स. १५७०), 'रुक्मिणी स्वयंवर', भावार्थ रामायण ( इ. स. १५९९) या ग्रंथांच्या माध्यमातून अध्यात्म सोपे करून सांगितले. आपल्या आख्यान कवितेतून ...

"असा कसा देवाचा देव बाई ठकडा । देव एका पायाने लंगडा ग बाई लंगडा ॥",
"भिंगाचे भिंगुले खांद्यावरी आंगुले । नाचत तान्हुले यश्वदेचे ग बाई ॥",
"मन रामी रंगले । अवघे मनचि राम झाले ।",
"सगुण चरित्रे परम पवित्रे सादर वर्णावी ।",
"ऐक ऐक सखये बाई । नवल मी सांगू काई ।
त्रैलोक्याचा धनी तो हा। यशोदेसी म्हणतो आई ॥",
"वारियाने कुंडल हाले । डोळे मोडीत राधा चाले ॥
राधा पाहून भुलले हरी । बैल दुभे नंदा घरी ॥",



**संत एकनाथ (इ. स. १५२८ - इ. स. १५९९)**

"तुझी संगती नाही कामाची । मी सुंदरा कोवळ्या मनाची ॥",
"दार उघड बया दार उघड ।",
"मोडकेसे घर । तुटकेसे छप्पर ॥
देवाला देवघर नाही ॥ मला दादला नको ग बाई ॥",
"मनुष्य इंगळी अति दारुण । मज नांगा मारिला तिनें ।
सर्वांगी वेदना जाण । त्या इंगळीची ।।",
"बाई मी भोळी ।",
"जोहार मायबाप जोहार । विठू पाटलाचा महार ॥",
"अशी ही थट्टा । भल्याभल्याशी लाविला बट्टा ॥",
"दत्त दत्त ऐसे लागले ध्यान । हारपले मन झाले उन्मन ॥",
“आलो तुझ्या दर्शनासी । भेट दयावी बा आम्हांसी ।।
सर्व संत हो राऊळीं। मी रे एकटी तळमळी ॥
करुणा आईक विठाई । मज बाळा भेटी देई ॥
देव आले हो बाहेरी । मज नेलें खांदयावरी ॥
भागु म्हणे भेट झाली । माझी चिंता ही हारली ॥"

(पदे, गौळणी, भारुडं) जनजागृती केली.

"संस्कृत भाषा देवे केली । प्राकृत काय चोरापासून आली ॥"

असा प्रश्न विचारून मराठी ग्रंथ लेखनाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. संस्कृतनिष्ठांची कडक शब्दांत हजेरी घेतली.

संत नामदेव - ज्ञानेश्वरांनी रचलेल्या भागवत संप्रदायाच्या इमारतीवर कळस होण्याचे भाग्य संत तुकारामांना (इ. स. १६०८ - इ. स. १६५०) लाभले.

"वेदांचा तो अर्थ आम्हासिच ठावा । येरांनी वाहावा भार माथा ।।
खादल्याची गोडी देखिल्यासी नाही । भार धन वाही मजुरीचे ।।
उत्पत्तिपाळण संहाराचे निज । जेणे नेले बीज त्याचे हाती ।।
तुका म्हणे आम्हा सापडले मूळ । आपणचि फळ आले हाता ।।",
"भले देऊ कासेचि लंगोटी । नाठाळाचे माथी हाणू काठी ॥",
"देवावरी विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ।



**संत तुकाराम (इ. स. १६०८ - इ. स. १६५०)**

तेथे पैजाराचे काम । अधमासि तो अधम ॥",
"आम्हां हे कौतुक जगा द्यावी नीत । करावी फजित चुकती जे ॥",
"आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जन लोका ॥",
"तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी ॥"

त्यांचे हे व इतर अभंग जीवनावर परखड भाष्य करतात.

"खेळ मांडियेला वाळवंटी घाई । नाचती वैष्णव भाई रे ॥"

चंद्रभागेच्या काठावर वारकऱ्यांच्या भक्ती सोहळ्यातील तल्लीनता इथं चित्रित झाली आहे. वारकरी एकमेकांचा किती आत्मीयतेने आदर करतात याचेही चित्रण या अभंगात आले आहे. वारकरी संप्रदायाने समाजाला दिलेली समता, बंधुता ही मूल्ये इथे प्रभावीपणे अधोरेखित झाली आहेत.

“सुंदर ते ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेऊनिया ।
तुळसीहार गळा कासे पितांबर । आवडे निरंतर हेचि ध्यान ।”

हे त्यांनी विठ्ठलाचे रेखाटलेले शब्दचित्र परमसुंदर व मनोवेधक असे आहे.

"घेई घेई माझे वाचे । घेई नाम विठोबाचे ॥",
"काय उणे आम्हां विठोबाचे पायी । नाही असे काही तेथे एक ॥",
"कोणे गावी आहे सांगा हा विठ्ठल । जरी ठावा असेल तुम्हां कोणा ॥",
"न लगे सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण ॥",
"कन्या सासुरासी जाये । मागे परतोनी पाहे ॥",
"भेटी लागे जीवा लागलीसे आस । पाहे रात्रंदिवस वाट तुझी ॥"

या व यासारख्या अभंगांच्या माध्यमातून व्यक्त झालेली विठ्ठल भेटीची आस, नाममाहात्म्य,

"चला पंढरीसी जाऊ । रखुमादेवीवरा पाहू ।
डोळे निवतील कान । मना तेथे समाधान ॥"

या व यासारख्या अभंगांच्या माध्यमातून पंढरपूर व विठ्ठलाच्या भेटीचे केलेले आवाहन,

"आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंदचि अंग आनंदाचे ॥"

या व यासारख्या अभंगांच्या माध्यमातून पंढरपूरचे दर्शन, विठ्ठल-रुक्मिणी यांच्या दर्शनाने झालेला आनंद,

"हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ।।
नलगे मुक्ति धन संपदा । संतसंग देई सदा ।।
तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।।"

या व यासारख्या अभंगांच्या माध्यमातून अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी मागितलेले ‘पसायदान’ इ. पैलूंमुळे संत तुकाराम यांचे वेगळेपण अधोरेखित होते.

"आम्हां हे कौतुक जगा द्यावी नीत । करावी फजित चुकती जे ॥",
"भले देऊ कासेचि लंगोटी । नाठाळाचे माथी हाणू काठी ॥"

यासारख्या अभंगांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक जागृती व भक्तीचा प्रसार केला. त्यासाठी त्यांना कीर्तनसंस्था अधिक महत्त्वाची वाटते.

"यारे सारे लहानथोर । याति भलति नारी नर ॥",
"विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥"

यासारख्या अभंगांच्या माध्यमातून त्यांनी जातिव्यवस्थेवर प्रहार केला. या संदर्भात गं. बा. सरदार म्हणतात की, “तुकारामांनी भक्तिपंथाचा प्रसार करताना समाजातील नीतिमूल्यांची जोपासना केली असे म्हटले तरी एवढ्याने त्यांच्या कामगिरीचा पुरा उलगडा होत नाही. महाराष्ट्रात शहरे अगोदर थोडी आणि त्या मानाने व्यापारही बेताचाच. यामुळे येथील सर्वसाधारण वैश्यांची स्थिती शूद्रांहून फार भिन्न नव्हती. तेव्हा महाराष्ट्रातील बहुजन समाजाची संस्कृती ही मुख्यतः शेतकऱ्यांची व कारू-नारूंचीच होती असे म्हणावयास हरकत नाही. या वर्गाच्या भावना आणि आकांक्षा तुकारामांच्या वाङ्मयात आत्मीयतेने प्रकट झाल्या आहेत. हेच त्यांच्या व्यक्तित्वाचे वैशिष्ट्य आहे. त्यांचा अलौकिक जीवनक्रम शूद्रातिशूद्रांच्या दृष्टीने अभिमानास्पद व स्फूर्तिदायक आहे.” ❸ (गं. बा. सरदार, ‘संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती’ (पहिली आवृत्ती - १९५० : महाराष्ट्र साहित्य परिषद), दहावी आवृत्ती - फेब्रुवारी २०१९, लोकवाङ्मय गृह, प्रभादेवी, मुंबई. ४०००२५. दहावी आवृत्ती - फेब्रुवारी २०१९, पृ. क्र. ११०, १११) गं. बा. सरदार यांनी केलेले हे भाष्य संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती अधोरेखित करणारा आहे.

“सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वता एवढे ॥”
"अणुरणीया थोकडा । तुका आकाशाएवढा ॥",

यासारख्या अभंगातून जीवनाचे सार व्यक्त होत असल्यामुळे ते अविस्मरणीय झाले आहेत.

"शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ॥",
"दया क्षमा शांती । तेथे देवाची वसति ॥",
"निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेचि फळ ॥",
"तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात ॥",
"मुलाम्याचे नाणे । तुका म्हणे नव्हे सोने ॥"

यासारख्या अभंगांना सुंदर सुभाषितांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. १७व्या शतकातील महाराष्ट्राची संस्कृती व भाषा यांचे दर्शन त्यामध्ये घडते.

"वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षीये सुस्वरे आळविती ॥"

असा निसर्गाशी सुसंवाद साधून निसर्गावर प्रेम करणाऱ्या माणसाला निसर्गावर अधिक प्रेम करायला प्रवृत्त केले.

"जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।
तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥"

असा विचार व्यक्त करून रंजल्या-गांजल्यांना पोटाशी धरून प्रेम व वात्सल्याची उधळण केली. साडेतीनशे-चारशे वर्षांपूर्वी शेतकऱ्यांची कर्जे माफ करून कृती-उक्तीची सांगड घातली. प्रसंगी परखड, कठोर बनून सर्वसामान्य माणसाचे मनोबल उंचावण्याचे कार्य केले. माणसांत देव शोधून मानवतेचा गौरव करणारे संत तुकाराम हे महाकवी होते.

महाराष्ट्र ही संतांची, वीरांची भूमी आहे. मराठी मन, मराठी संस्कृती यांची जडणघडण संतांनी केली. हा महाराष्ट्र संतांनी घडविला. 'आध्यात्मिक लोकशाही'तील संतांच्या कृती-उक्तीने महाराष्ट्राला समृद्ध असा सांस्कृतिक, आध्यात्मिक, नैतिक वारसा दिला. हा महाराष्ट्र संतानी घडविला यावर भाष्य करताना डॉ. यु. म. पठाण म्हणतात की, "आजच्या भौतिक जगात जी भोगलालसा दिसते आहे, तिचे कितीतरी भयानक दुष्परिणाम आपल्याला पाश्चिमात्य जगात आढळतात. मनोनिग्रहाचा अभाव हे याचे मूळ कारण आहे. त्यामुळे भोगलालसेने बरबटलेल्या युवकांच्या पिढ्यांवर योग्य ते उदात्त संस्कार न झाल्याने पाश्चिमात्यांच्या जीवनात एक भयानक पोकळी निर्माण झाली आहे. आपल्या जीवनातही ही भोगलालसा नाही असे नाही. आजच्या जीवनात हरघडी बलात्कार, हिंसा, भ्रष्टाचार, विवेकहीन वर्तन, पाशवी अत्याचार, दमन, शोषण, सर्व प्रकारच्या वासनांचे शमन इ. विषयींच्या घटना घडत असतात आणि त्या पाहून आपले मन सुन्न होत असते. कामक्रोधादि षड् रिपूंच्या प्रभावामुळेच हे सारे घडते, हे संतसाहित्याने शतकानुशतके सांगितले आणि जनसामान्यांवर हे उदात्त संस्कार केले. या उदात्त मूल्यांची आजच्या काळात गरज नाही का? इंद्रियनिग्रहाचे सुसंस्कार करण्याचे सामर्थ्य संतसाहित्यात आहे आणि म्हणून विशेषतः आजच्या भरकटणाऱ्या तरुण पिढीवर संतसाहित्याचे हे उदात्त संस्कार होणे आवश्यक आहे." ❹ (डॉ. यु. म. पठाण, (लेख - 'संतसाहित्य कालचे : संदर्भ आजचा'), 'ज्ञानेश्वरी व विसावे शतक' (संपादक - स्नेहल तावरे), स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

४११००८., प्रथमावृत्ती - ऑक्टोबर १९९०, पृ. क्र. ३३) संतानी घडविलेला हा पुरोगामी महाराष्ट्र भारतासाठी व जगासाठी किती महत्वाचा आहे हे डॉ. यु. म. पठाण यांच्या या विचारातून लक्षात येते. वारकऱ्यांवर समता, बंधुत्व, विवेक, मानवता, विश्वबंधुत्व, इ. उदात्त जीवनमूल्यांचे संस्कार केले. येथील राज्यकर्त्यांना, समाजसुधारकांना वैचारिक वारसा दिला. यासंदर्भात गं. बा. सरदार म्हणतात की, "ज्ञानेश्वर-तुकारामादी मराठी संतांचे कार्य हे केवळ सांप्रदायिक स्वरूपाचे नसून ती एक व्यापक चळवळ होती. त्यांचा वारकरी संप्रदाय हा काहीं विठ्ठलोपासकांचा एक साधासुधा भक्तिपंथ नव्हता, तर शैव, नाथ, दत्त, चैतन्य, आनंद, सुफी इत्यादी पंथांतील उदार, चिंतनशील व संस्कारक्षम भक्तजनांना सामावून घेणारे ते एक सर्वसंग्राहक उपासनापीठ होते. एक प्रभावी सांस्कृतिक केंद्र होते. या संत मंडळाच्या कार्याची प्रेरणा धार्मिक प्रबोधनाची होती. त्या काळात सामाजिक जीवनाच्या राजकीय, आर्थिक, कौटुंबिक, सांस्कृतिक अशा विविध अंगोपांगांवर धर्माचे वर्चस्व होते, एवढेच नव्हे तर धर्म आणि संस्कृती ही एकरूपच मानली जात होती. तेव्हा ज्यांना ज्यांना समाजजीवनाला कालमानानुसार काही नवे वळण देण्याची आवश्यकता वाटली ते ते साहजिकच धर्मजागृतीच्या कार्याकडे वळले. लोकांना धर्माचे रहस्य विशद करून सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ज्ञानेश्वर-नामदेव प्रभृती संतांनी याच दृष्टीने धार्मिक प्रबोधनाचे कार्य हाती घेतले होते. हिंदू धर्म व संस्कृती यांचे शिल्पकार व सूत्रचालक मुख्यतः द्वैवर्णिक म्हणजेच ब्राह्मण व क्षत्रिय होते. शूद्र व अतिशूद्र समाजातील लोकांच्या वाट्याला या श्रुतीस्मृतीप्रणीत जीवनपद्धतीत काबाडकष्टांशिवाय काहीही आलेले नव्हते. कौटुंबिक जीवनात सर्व वर्णांच्या स्त्रियांना गुलाम म्हणून वागवले जात होते. खालच्या जातींतील लोकांच्या ठिकाणी धर्मभावना नव्हती असे नाही. परंतु त्यांचे धर्माचरण बहुतांशी प्राकृतिक पातळीवरचे होते. त्यात क्षुद्र देवता-भक्तीचे प्राबल्य होते. अंधश्रद्धा, गतानुगतिकत्व, दीनवाणेपणा, भयाकुलता, उत्सवप्रियता अशा वृत्तिप्रवृत्तींनी त्यांची धर्मभावना वेढलेली होती. तिला तत्त्वचिंतन, भावशुद्धी, नैतिकता व सदाचार यांची जोड देण्याची मराठी संतांची धडपड होती." ❺ (गं. बा. सरदार, (लेख - 'धार्मिक प्रबोधनाची फलश्रुती') 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' (पहिली आवृत्ती - १९५० : महाराष्ट्र साहित्य परिषद), दहावी आवृत्ती - फेब्रुवारी २०१९, लोकवाङ्मय गृह, प्रभादेवी, मुंबई. ४०००२५. दहावी आवृत्ती - फेब्रुवारी २०१९, पृ. क्र. १३८) गं. बा. सरदार यांनी केलेले हे भाष्य संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती अधोरेखित करणारा आहे. त्यामुळे फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात आजच्या महाराष्ट्राचे पुरोगामित्व नजरेत भरते. या संतांनी पुरोगामी महाराष्ट्राची पायाभरणी केली.

## संदर्भ –


१. ल. रा. पांगारकर, (लेख - 'ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानेश्वरी' संकलन - डॉ. हे. वि. इनामदार), 'ज्ञानेश्वरी दशरूप दर्शन', संपादक - डॉ. हे. वि. इनामदार, चंद्रमा प्रकाशन, पुणे. ४११००९. प्रथमावृत्ती - १९ जानेवारी १९९०, पृ. क्र. १४१

२. डॉ. ल. रा. नसिराबादकर, (लेख - 'ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानेश्वरी' संकलन - डॉ. हे. वि. इनामदार), 'ज्ञानेश्वरी दशरूप दर्शन', संपादक - डॉ. हे. वि. इनामदार, चंद्रमा प्रकाशन, पुणे. ४११००९. प्रथमावृत्ती - १९ जानेवारी १९९०, पृ. क्र. १४३

३. गं. बा. सरदार, 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' (पहिली आवृत्ती - १९५० : महाराष्ट्र साहित्य परिषद), दहावी आवृत्ती - फेब्रुवारी २०१९, लोकवाङ्मय गृह, प्रभादेवी, मुंबई. ४०००२५. दहावी आवृत्ती - फेब्रुवारी २०१९, पृ. क्र. ११०, १११

४. डॉ. यु. म. पठाण, (लेख - 'संतसाहित्य कालचे : संदर्भ आजचा'), 'ज्ञानेश्वरी व विसावे शतक' (संपादक - स्नेहल तावरे), स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. ४११००८., प्रथमावृत्ती - ऑक्टोबर १९९०, पृ. क्र. ३३

५. गं. बा. सरदार, (लेख - 'धार्मिक प्रबोधनाची फलश्रुती') 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' (पहिली आवृत्ती - १९५० : महाराष्ट्र साहित्य परिषद), दहावी आवृत्ती - फेब्रुवारी २०१९, लोकवाङ्मय गृह, प्रभादेवी, मुंबई. ४०००२५. दहावी आवृत्ती - फेब्रुवारी २०१९, पृ. क्र. १३८